असा. क्र. ४४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, ऑगस्ट २३, २००४/भाद्र १, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८.**—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . | ४२२-४२५ |

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑगस्ट २००४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXVIII OF 2004.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००४ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ७८ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७८ मधील, पोट-कलम (१क) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९६२ चा महा. ५.

" (१क) कलम ७९ क च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेली एक जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती देखील असेल. ".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ७९क ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९क ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीची रचना.

" ७९क. (१) कलम ८१ च्या तरतुदींना अधीन राहून, जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल,—

| | |
|---|---|
| (क) अध्यक्ष, .. | पदसिद्ध सभापती ; |
| (ख) कलम ७८ च्या पोट-कलम (१) अन्वये रचना केलेल्या सर्व विषय समित्यांचे सभापती, | पदसिद्ध सदस्य ; |
| (ग) जिल्हा परिषदेने परिषद सदस्यांमधून निवडून द्यावयाचे चार परिषद सदस्य, यांपैकी दोनपेक्षा कमी नसतील इतके सदस्य, महिला सदस्य असतील, | पदसिद्ध सदस्य ; |
| (घ) मुख्य कार्यकारी अधिकारी, .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ङ) कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) जिल्हा परिषद ; कार्यकारी अभियंता (लहान पाटबंधारे) जिल्हा परिषद, | पदसिद्ध सदस्य ; |
| (च) स्वच्छता पाहणारे जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, | पदसिद्ध सदस्य ; |
| (छ) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), आणि. . | पदसिद्ध सदस्य ; |
| (ज) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी. .. | पदसिद्ध सदस्य-सचिव : |

परंतु, समितीस, आपली कामे आणि कर्तव्ये पार पाडताना समितीस सहाय्य किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनाकरिता, विशेष निमंत्रित म्हणून, जलसंधारण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता या विषयातील क्षेत्रात काम करणाऱ्या व या विषयांचे विशेष ज्ञान व अनुभव असणाऱ्या, जिल्ह्यातील सहाय्य संघटनांच्या (अशासकीय संघटना, समंत्रक, शैक्षणिक संस्था) दोन पेक्षा अधिक नाही इतक्या प्रतिनिधींना निमंत्रित करता येईल :

परंतु आणखी असे की, खंड (घ), (ङ), (च), (छ) व (ज) अन्वये नियुक्त केलेले पदसिद्ध सदस्य आणि समितीच्या बैठकीला किंवा बैठकींना हजर राहण्यासाठी निमंत्रित केलेले विशेष निमंत्रक, यांना समितीच्या चर्चेत भाग घेता येईल परंतु अशा बैठकींमध्ये मत देण्याचा कोणताही हक्क असणार नाही.

(२) जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तद्न्वये विषय समितीला नेमून देण्यात आलेल्या विषयांच्या संबंधात विषय समितीला जे सर्व अधिकार असतील आणि ज्या अधिकारांचा ती वापर करीत असेल ते, सर्व अधिकार जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला जलसंधारण, जतन, वापर, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता या विषयांच्या संबंधात असतील आणि ती त्यांचा वापर करील. ”.

## निवेदन.

एकात्मिकृत जल व्यवस्थापनास, आणि विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्था या समाजाचा सहभाग आणि तळागाळातील जनतेचा निर्णयाधिकार यांच्या सहाय्याने सर्वंकष जल व्यवस्थापन करू शकणाऱ्या समुचित संस्थात्मक रचना असल्यामुळे अशा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत केल्या जाणाऱ्या एकात्मिकृत जल व्यवस्थापनास, राज्याने सर्वाधिक महत्त्व दिले आहे. या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, यामध्ये नवीन कलम ७९ क समाविष्ट करून, प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये एक जलसंधारण व पेयजल पुरवठा समिती घटित करण्यात आली आहे. तथापि, जिल्हा परिषदांमध्ये, ग्रामीण स्वच्छता या विषयाकडे लक्ष देणारी कोणतीही विषय समिती नाही.

२. स्वच्छतेच्या अभावामुळे आरोग्य, पर्यावरण आणि एकूण राहणीमान यांच्यावर होणारे विपरीत परिणाम भयावह स्वरूपाचे आहेत. यासाठी, राज्य ग्रामीण भागातील या पैलूकडे विशेष लक्ष देत आहे आणि ही परिस्थिती सुसह्य करण्यासाठी अनेक कार्यक्रम सुरू करण्यात आले असून, त्यापैकी बहुतांश कार्यक्रम हे जिल्हा परिषदांमार्फत राबवण्यात येत आहेत. म्हणून, राज्यातील ग्रामीण भागांमधील स्वच्छतेकडे लक्ष देण्यासाठी, जिल्हा परिषदांमध्ये, याच कामाला वाहून घेतलेल्या एका विषय समितीची गरज भासते आहे. त्याशिवाय, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांच्यामधील दाट सांगडही नजरेआड करता येणार नाही. म्हणून, स्वच्छता आणि जलविषयक पैलू एकाच छत्राखाली आणणे इष्ट आहे. म्हणून प्रत्येक जिल्हा परिषदांमध्ये, जल व्यवस्थापन व स्वच्छता यांच्या सर्व पैलूंकडे लक्ष देण्यासाठी, जल संधारण व पेयजल पुरवठा समितीच्या ऐवजी, जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती घटित करण्याविषयी ताबडतोब तरतूद करणे शासनास इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे. म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २१ ऑगस्ट २००४.

**मोहम्मद फज़ल,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. सी. खटुआ,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. ६४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७–३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, ऑगस्ट २३, २००४/ भाद्र १, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. XXVIII of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. XXVIII of 2004), published under the authority of the Governor.]

---

**WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd August 2004.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXVIII OF 2004.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take imme-
Mah. V diate action further to amend the Maharashtra Zilla Parishads and
of 1962. Panchayat Samitis Act, 1961 for the purposes hereinafter appearing ;



[ **किंमत** : रुपये ४.०० ]

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause *(1)* of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Ordinance may be called the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Ordinance, 2004.

*(2)* It shall come into force at once.

Amendment of section 78 of Mah. V of 1962.

**2.** In section 78 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 ( hereinafter referred to as " the principal Act " ), for sub-section *(1A)*, the following shall be substituted, namely :— Mah. V of 1962.

" *(1A)* There shall also be a Water Management and Sanitation Committee constituted in accordance with the provisions of section 79A.".

Substitution of section 79A of Mah. V of 1962.

**3.** For section 79A of the principal Act, the following shall be substituted, namely :—

Constitution of Water Management and Sanitation Committee.

" 79A. *(1)* Subject to the provisions of section 81, the Water Management and Sanitation Committee shall consist of,—

| | |
|---|---|
| *(a)* the President, | *ex officio* Chairman ; |
| *(b)* the Chairmen of all the Subjects Committees constituted under sub—section *(1)* of section 78, | *ex officio* Members; |
| *(c)* four Councillors, out of which not less than two shall be women, to be elected by the *Zilla Parishad* from amongst the Councillors, | *ex officio* Members; |
| *(d)* the Chief Executive Officer, | *ex officio* Member ; |
| *(e)* the Executive Engineer (Rural Water Supply), *Zilla Parishad;* the Executive Engineer (Minor Irrigation), *Zilla Parishad*, | *ex officio* Members; |
| *(f)* the Deputy Chief Executive Officer, *Zilla Parishad* looking after sanitation, | *ex officio* Member; |
| *(g)* the Deputy Chief Executive Officer *(Panchayat)*, and | *ex officio* Member; |
| *(h)* the Additional Chief Executive Officer. | *ex officio* Member-Secretary : |

Provided that, the Committee may invite not more than two representatives of Support Organisations in the district (NGOs, consultants, educational institutions) working in the field and having special knowledge and experience in the subject of water conservation, drinking water supply and sanitation, as special invitees, for the purpose of assisting or advising the Committee in discharge of its duties and functions :

Provided further that, the *ex officio* Members appointed under clauses (*d*), (*e*), (*f*), (*g*) and (*h*) and the special invitees may take part in the deliberations of the Committee but shall have no right to vote in such meetings.

(*2*) The Water Management and Sanitation Committee shall have and exercise, in relation to the subjects of water conservation, preservation, utilisation, drinking water supply and sanitation, all the powers which the Subjects Committee has and exercises in relation to the subjects allocated to it, by or under the provisions of the Act.".

STATEMENT

The State has given utmost importance to integrated water management, especially through Local Self-Government institutions, as it is considered an appropriate institutional set up for holistic water management with community participation and grass root level decision making. For this purpose, a separate Water Conservation and Drinking Water Supply Committee has been constituted in each *Zilla Parishad* by inserting section 79A in the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961. However, there is no Subjects Committee in the *Zilla Parishad* to look after the Rural Sanitation.

2. The adverse impacts of lack of sanitation on the health, environment and quality of life of the rural masses are devastating. The State is, therefore, giving special attention to this aspect in the rural areas, and many programmes have been introduced to ameliorate this situation, most of which are implemented through *Zilla Parishads*. There is, therefore, a felt need for a dedicated Subjects Committee in the *Zilla Parishad* to look after the sanitation in rural areas of the State. Moreover, the intimate relations between water supply and sanitation cannot be ignored. It is, therefore, expedient and desirable to integrate the sanitation and water aspects under one umbrella. The Government, therefore, considers it expedient immediately to provide for constitution of Water Management and Sanitation Committee in each *Zilla Parishad*, in place of the Water Conservation and Drinking Water Supply Committee, to look after all aspects of water management and sanitation.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 21st August 2004.

MOHD. FAZAL,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. C. KHATUA,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई